संदर्भ: सकाळ आवृत्ती : पुणे दि. ३० डिसेंबर २०१८ पान नं. ४

सकाळ

# जागांच्या आकड्यांमध्ये घोळ

## 'एमपीएससी'कडून महिनाभरात तीनदा जाहिरात देऊनही तफावत

महाराष्ट्र लोकसेवा आयोग

पुणे, ता. २९ : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) उपजिल्हाधिकारी, सहायक पोलिस आयुक्त, उपशिक्षणाधिकारी अशा नऊ संवर्गातील ३६० जागांसाठी राज्यसेवा पूर्वपरीक्षेची जाहिरात या महिन्यात तीनदा प्रसिद्ध केली. मात्र, पदांच्या आकडेवारीत घोळ केल्याचे निदर्शनास येत आहे. संवर्गानुसार जागांची संख्या ३५० असताना, आयोगाने ३६० जागांची भरतीप्रक्रिया जाहीर केली आहे.

आयोगाने १० डिसेंबरला जाहिरात प्रसिद्ध केली होती. त्या वेळी ११ संवर्गांसाठी ३४२ पदांसाठी परीक्षा होणार असल्याचे जाहीर केले होते. मात्र, पदांमध्ये घट करण्यासाठी त्यात सुधारणा करण्यात आली. संवर्गातील पदांमध्ये घट करून सुधारित शुद्धिपत्रक १३ डिसेंबरला काढले. मात्र, त्यातही आयोगाचा सावळागोंधळ दिसून आला. त्या वेळी ३३९ पदांची भरती जाहीर केली. त्यात प्रत्यक्षात चार संवर्गांसाठी केवळ २६१ पदे होती. जवळपास ७८ पदांचा फरक होता. त्यानंतर आयोगाने पुन्हा त्यात बदल केला आणि शनिवारी ३६० पदांसाठी शुद्धीपत्रक काढले. तिसऱ्यांदा काढलेल्या शुद्धीपत्रकातही त्रुटी दिसून आल्या. यात एकूण ३६० पदांचा उल्लेख असला, तरी प्रत्यक्षात ३५० जागा आहेत, त्यामुळे नेमक्या किती पदांसाठी आयोगाने शुद्धीपत्रक काढले, याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. याबाबत आयोगाचे उपसचिव सुनील अवताडे यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही.

### प्रत्यक्षात जागा ३५०

उपजिल्हाधिकारी (४०), पोलिस उप अधीक्षक/ सहायक पोलिस आयुक्त (३१), सहायक संचालक- वित्त व लेखा सेवा (१६), उपमुख्य कार्यकारी अधिकारी/ गटविकास अधिकारी (२१), तहसीलदार (७७), उपशिक्षणाधिकारी (२५), कक्ष अधिकारी (१६), सहायक गटविकास अधिकारी (११), नायब तहसीलदार (११३).

" महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या राज्यसेवा पूर्वपरीक्षेसाठीच्या जाहिरातीत पदांचा घोळ असल्याचे दिसून येते, त्यामुळे नेमकी किती पदांची भरती होणार, असा प्रश्न उपस्थित राहत आहे. आयोगाने तातडीने सुधारित शुद्धीपत्रक जाहीर करावे.

\- चैतन्य देशमुख, उमेदवार

राज्यसेवा पूर्वपरीक्षा
**१७ फेब्रुवारी**

परीक्षा अर्ज मुदत
**४ जानेवारी**

Pune, Main
30/12/2018 Page No. 2